पी.आर-३/सबसिडी/ No 17984 दिनांक : 3 JUN 2016

वाणिज्य परिपत्रक क्र. २६५

**विषय** : सन २०१५-१६ रब्बी हंगामातील पिकांची पैसेवारी ५० पैशांपेक्षा कमी असलेल्या गावांमध्ये विविध उपाययोजना जाहीर करण्याबाबत.

- **वीज बिलात ३३.५ टक्के इतकी सवलत व दुष्काळसदृश्य परिस्थिती जाहीर केलल्या गावातील कृषी पंपाचा वीज पुरवठा खंडित न करणे.**

**संदर्भ** : शासन निर्णय क्र. एससीवाय-२०१६/प्र.क्र.५२/म-७, दि. १० मार्च, २०१६.

शासनाने संदर्भातील शासन निर्णयान्वये सन २०१५-१६ च्या रब्बी हंगामातील पिकांची हंगामी पैसेवारी ५० पैसेपेक्षा कमी असलेल्या १०५३ (परिशिष्ट -अ) गावांमध्ये दुष्काळसदृश्य परिस्थिती जाहीर केलेली आहे. शासनाने सदर निर्णयानुसार टंचाईसदृश्य गावांमध्ये खालीलप्रमाणे सवलती लागू करण्याबाबत निर्देश दिलेले आहेत.

१) दुष्काळसदृश्य गावातील कृषी ग्राहकांना वीज बिलात शासनाच्या प्रचलित सवलतीच्या दरामध्ये ३३.५ टक्के सूट देण्यात यावी.

२) दुष्काळसदृश्य परिस्थिती जाहीर केलेल्या गावात शेतकऱ्यांच्या शेतीच्या पंपाची वीज जोडणी खंडीत न करणे.

सर्व क्षेत्रीय कार्यालयांना कळविण्यात येते की, शासनाच्या वरील आदेशाची तात्काळ अंमलबजावणी करण्यात यावी. तसेच शासनाच्या आदेशानुसार स्थानिक जिल्हाधिकारी कार्यालयातून सन २०१५-१६ च्या रब्बी हंगामातील पैसेवारी ५० पैसेपेक्षा कमी आलेला आहे अशा गावांची यादी प्राप्त करावी. शासन निर्णयानुसार टंचाईसदृश्य गावातील (परिशिष्ट अ ) कृषी ग्राहकांनी सन २०१५-१६ या वर्षात वीज देयकात ३३.५ टक्के सवलत दिल्यामुळे शासनावर पडणाऱ्या आर्थिक भाराच्या रकमेची परिगणना माहिती व तंत्रज्ञान विभागाने करावी जेणेकरुन, शासनाकडे प्रतिपूर्तीच्या रकमेच्या पुढील कार्यवाहीसाठी प्रस्ताव पाठविण्यात येईल.

सहपत्र : वरीलप्रमाणे.

(स्वाक्षरी) ३.६.१६
मुख्य अभियंता (वाणिज्य)

__प्रत सस्नेह रवाना__ :

१) सर्व मुख्य अभियंता, सं व सु परिमंडल (महावितरण)

२) मुख्य महाव्यवस्थापक (माहिती व तंत्रज्ञान), महावितरण, मुंबई.

- आपणांस कळविण्यात येते की, वरील विषयासंदर्भात टंचाईसदृश्य गावातील कृषी ग्राहकांना रब्बी हंगाम सन २०१५-१६ च्या वीज बिलात शासनाच्या प्रचलित सवलतीच्या दरामध्ये ३३.५ टक्के सवलत देण्यात यावी व दिलेल्या सवलतीपोटी वितरण कंपनीवर पडणाऱ्या आर्थिक भाराची परिमंडल व ग्राहक संख्यानिहाय माहिती त्वरित पाठविण्यात यावी जेणेकरुन, शासनाकडून पूर्तता करण्याकरिता प्रस्ताव पाठविण्यास मदत होईल.

३) मुख्य महाव्यवस्थापक (सांघिक वित्त), महावितरण, मुंबई.

__प्रत रवाना__ : प्रेषण यादीप्रमाणे.

शासन निर्णय क्रमांक :- एससीवाय- २०१६/ प्र.क्र. ५२ /म-७
दिनांक :- १० मार्च, २०१६

सन २०१५-१६ सालातील रब्बी पिकांच्या हंगामी पैसेवारीचा गोषवारा
परिशिष्ट -"अ"

| अ.क्र. | विभाग | जिल्हा | पैसेवारी जाहीर केलेली गावे | ५० पैशांपेक्षा कमी पैसेवारी असलेली गावे | ५० पैशांपेक्षा जास्त पैसेवारी असलेली गावे |
|---|---|---|---|---|---|
| १ | नाशिक | अहमदनगर | १०१८ | ४०८ | ६१० |
| | एकूण | | १०१८ | ४०८ | ६१० |
| २ | पुणे | सोलापूर | ११४४ | ६४५ | ४९९ |
| | एकूण | | ११४४ | ६४५ | ४९९ |
| | राज्याची एकूण | | २१६२ | १०५३ | ११०९ |